मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



देवाचा
बलवान
मनुष्यः
शमशोन

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest; Alastair Paterson

रूपान्तरकार: Lyn Doerksen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2021 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

फार वर्षांपूर्वी, इस्त्राएल देशात, मानोहा नावाचा एक मनुष्य राहात होता. त्याला व त्याच्या पत्नीला काही मुलबाळ नव्हते. एकेदिवशी देवाच्या दुताने मानोहाच्या पत्नीला दर्शन दिले. तो म्हणाला,

"तुला फार अद्‌भुत बाळ होईल."

हि अद्‌भुत बातमी तिने तिच्या पतीला सांगितली. "हे माझ्या प्रभू...आमच्याकडे परत ये. आम्ही लेकरासाठी काय करावे हे आम्हांला शिकव." अशी मानोहाने प्रार्थना केली.



देवदुताने मानोहाला सांगितले की, त्या मुलाचे केस कधिच कापू नये, दारु कधिच पिऊ नये, आणि काही ठराविक अन्न सेवन करु नये. शास्ता बनण्यासाठी देवाने या मुलाची निवड केली आहे. तो इस्त्राएलाचे नेतृत्व करिल.



देवाच्या लोकांना निश्चितच मदतीची गरज होती.
त्यांनी त्यांच्या जीवनातून देवाला काढून टाकल्यामुळे
त्यांना त्यांचे शत्रू पलिष्टी;...



...यांच्या ताब्यात जाव लागले. परंतू जेंव्हा त्यांनी प्रार्थना केली ती देवाने झऐकली. त्याने हे बाळ पाठविले जे बाळ जगातील सर्वातबलवान पुरुष बनणार होते.

"पुढे त्या स्त्रीला मुलगा झाला तिने त्याचे नाव शमशोन असे ठेवले. तो मुलगा मोठा झाला व परमेश्वराचा आशिर्वाद त्याच्यावर होता. आणि परमेश्वराच्या

आत्म्याचा संरचार
त्याच्यावर होऊ लागला.
शमशोन फार
बलशाली झाला. एके
दिवशी तो रिकाम्या
हाताने एका तरुण
सिंहाशी लढला
आणि त्याने त्याला ठार मारले !

काहि
दिवसांनी त्या
मेलेल्या सिंहाच्या
शरिराच्या आंतमध्ये एक मधाचे
पोळे त्याला दिसले तेथून मध काढून
तो त्याने खाल्ला. त्याने एक कोडे तयार केले :
"भक्षकांतून भक्ष्य व उग्रांतून मधुर ते काय?"

कोणीही या
कोड्याचा अर्थ सांगू शकत नव्हते
– पंरतू शमशोनची नविन पत्नी, जी
पलिष्टी होती, तिने तिच्या मित्रांनाउत्तर
सांगितले. यामुळे शमशोनला फार राग आला.

पलिष्टी लोकांनी, शमशोनची पत्नी त्याच्याच एका जवळच्या मित्राला देऊन टाकली तेंव्हा तर शमशोनला फारच राग आला. त्याने बदला घेण्याचे ठरविले. पण कसा? शमशोनने सर्वप्रथम ३०० कोल्हे पकडले. आणि दोन–दोन कोल्ह्यांच्या शेपटा एकत्रित बांधल्या, आणि त्या दोघांच्या मध्ये जळती मशाल बांधली.

आणि मग त्या कोल्ह्यांना शमशोनने पलिष्टी लोकांची
उभी पिके असलेल्या शेतात सोडून दिले.

आता पलिष्टी लोक त्याचा बदला घेऊ इच्छित होते. शमशोन स्वतःहून पकडला गेला, त्याला दोरांनी बांधून जिवे मारावे म्हणून पलिष्टी लोकांच्या स्वाधिन करण्यात आले.

परंतू देवाचा आत्मा
शमशोनवर उतरला. त्याने ते
दोर तोडून टाकले, मग
गाढवाचे नवे जाभाड त्याने
उचलून घेतले, आणि १,000
शत्रूंना ठार मारले.



शमशोनला पकडण्यासाठी पलिष्टी लोकांच्या टोळ्या शमशोनवर पाळत ठेऊन होत्या. एके दिवशी त्यांनी सापळा रचून त्याला एका शहरात अडकविले आणि त्यांनी शहरवेशीचे दारे बंद करुन घेतले.

परंतू शहरवेशीचे दरवाजे उखडून खांद्यावर घेतली व तो चालत शहरा बाहेर आला !



परंतू शमशोन देवाविषयी अपयशी ठरला. जोपर्यंत तो देवाचे ऐकत होता तोपर्यंत देवाने त्याला शक्ति दिली.

एके दिवशी दलीला नावाच्या
एका सुंदर पलिष्टी स्त्री हेराला
त्याने त्याच्या अफाट
शक्तिचे रहस्य
सांगितले.

शमशोन एकदा झोपलेला असतांना तिच्या जवळ असलेल्या माणसाने शमशोनचे केस कापून टाकले.



मग दलीलाच्या
शयनकक्षात पलिष्टी
सैनिकांनी शमशोनवर
हल्ला केला – परंतू
त्याची शक्ति निघून गेली
होती. त्याच्या शत्रूंनी
त्याचे डोळे फोडले.



आंधळा आणि अशक्त
शमशोन आता
पलिष्ट्यांचा गुलाम
बनला. त्यांनी देवाच्या
या सेवकाची टिंगल
टवाळी करुन त्यावर
हसले.

पलिष्ट्यांनी उत्सव साजरा केला. त्यांच्या देवाने त्यांच्या शत्रूला त्यांच्या स्वाधिन केले आहे असे म्हणून त्यांनी त्यांचा मत्स देव – दागोन याला महायज्ञ अर्पून उत्सव साजरा केला. ते दागोनाच्या मंदिरात जमले व दारु पिऊन त्यांनी आनंद व्यक्त केला. आणि मग शमशोनाला त्यांची करमणूक करण्यासाठी त्यांच्या समोर आणले.

एका मुलाने त्याचा हात धरुन त्याला आणले, आणि ते मंदिर ज्या खांबांवर उभे होते त्या खांबांवर तो टेकून उभा राहिला. तेथे गच्चीवर सुमारे ३,000 पलिष्टी होते तसेच आजूबाजूला खूप लोक जमले होते, ते सर्व त्याची थट्टा मस्करी करित होते.



परंतू तुरुंगात असतांना शमशोनच्या डोक्याचे केस पुन्हा वाढू लागले होते. आता त्याने अशी प्रार्थना केली, "हे प्रभू परमेश्वरा, फक्त ह्या वेळेस मला बळ दे, म्हणजे



आपल्या डोळ्यांबद्दल मी पलिष्ट्यांचा एका झटक्यात बदला घेईन."

देव शमशोनला पुन्हा शक्ति देईल का? अशक्य वाटणारी गोष्ट शमशोन करेल का? होय! होय! त्याला शक्ति मिळाली आणि शमशोनने ते दोन्ही खांब रेटले. दागोनाचे मंदिर खाली कोसळले, त्यात हजारो पलिष्टी मरण पावले – आणि शमशोन देखिल मरण पावला !

देवाचा बलवान मनुष्यः शमशोन

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

शास्ते १३-१६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गीतल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!

जॉन 3:16